# जळगाव रेल्वे दुर्घटनेत १२ जणांचा मृत्यू!


मुलींचा जन्मदर वाढविण्यासाठी व्यापक जनजागृती करा- जिल्हाधिकारी डॉ. पाटील >>पान 2

भारतपर्व महोत्सवात असणार महाराष्ट्राचा 'मधाचे गाव' संकल्पनेवर आधारित चित्ररथ >>पान 3

बुलढाण्यात एलसीबी पथकाकडून तीन गुन्ह्यांची उकल तर एका गुन्ह्यातील आरोपींवर मोक्का अंतर्गत कारवाई >>पान 4



दैनिक
# आपला विदर्भ





'हेरा फेरी ३' च्या शूटिंगला कधी होणार सुरुवात?

आतील पान

**सुविचार**

शहाणपणाने घेतलेले निर्णय आयुष्य बदलून टाकतात.


apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 162 ■ गुरूवार, दि. 23 जानेवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


# आग लागल्याच्या भीतीने प्रवाशांच्या रेल्वेमधून उड्या

## समोरून येणाऱ्या रेल्वेने उडवलं

दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी : जळगावच्या पाचोरा रेल्वे स्थानकाजवळ भीषण दुर्घटना घडली आहे. पुष्पक एक्सप्रेसमध्ये आग लागल्याची अफवा पसरल्यानंतर प्रवाशांनी ट्रेनमधून उड्या मारायला सुरूवात केली, त्याचवेळी समोरून जाणाऱ्या ट्रेनखाली काही प्रवासी आले आहेत, या अपघातामध्ये सात ते आठ जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती होती. मात्र, संध्याकाळी मृतांचा आकडा वाढला आहे. मृतांची संख्या १६ वर पोहोचली आहे. मृतांची संख्या आणखी वाढण्याची भीती वर्तवली जात आहे. आगीची अफवा पसरल्यानंतर प्रवाशांनी ट्रेनमधून उड्या मारायला सुरूवात केली, तेव्हाच समोरून बंगळुरू एक्सप्रेस जात होती, या एक्सप्रेसखाली काही प्रवासी आले, ज्यात त्यांचा मृत्यू झाला आहे. मृतांचा आकडा वाढण्याची भीती वर्तवण्यात येत आहे.**







**रेल्वे विभागाची प्रतिक्रिया**

रेल्वे विभागाने दिलेल्या माहितीनुसार पाचोरा रेल्वे स्टेशनजवळ ही दुर्घटना घडली आहे. पुष्पक एक्सप्रेस जागेवर उभी होती, तेव्हा आगीची अफवा पसरली आणि काही जणांनी उड्या मारायला सुरूवात केली. तेव्हाच समोरून बंगळुरू एक्सप्रेस जात होती, उड्या मारल्यानंतर प्रवासी बंगळुरू एक्सप्रेसखाली आले. संध्याकाळी ४ वाजून २० मिनिटांच्या सुमारास ही घटना घडली आहे. घटनास्थळी ८ रुग्णवाहिका रवाना झाल्या आहेत. तसंच जखमींना तातडीने शासकीय रुग्णालयात दाखल केलं जात आहे.

पुष्पक एक्स्प्रेस ही लखनऊवरून मुंबईला येत होती, तर बंगळुरु एक्सप्रेस भुसावळच्या दिशेने भरधाव वेगात चालली होती. तेव्हाच पुष्पक एक्सप्रेसमध्ये आग लागल्याची अफवा पसरली, यानंतर पुष्पक एक्स्प्रेसमधल्या प्रवाशांनी चेन ओढून ट्रेन थांबवली. आगीच्या अफवेनंतर प्रवाशांनी पुष्पक एक्स्प्रेसमधून धडाधड उड्या मारायला सुरुवात केली, पण समोरून बंगळुरू एक्स्प्रेस येत असल्याचं प्रवाशांना दिसलं नाही आणि हा भीषण अपघात झाला आहे.

**कशी पसरली अफवा?**

प्रवाशांनी दिलेल्या माहितीनुसार पुष्पक एक्स्प्रेस मुंबईच्या दिशेने येत असताना रूळ आणि चाकांचं घर्षण झाल्यामुळे ठिणग्या पडत होत्या. या ठिणग्या ट्रेनमधील प्रवाशांनी पाहिल्या आणि त्यांना आग लागल्याचं वाटलं, त्यामुळे त्यांनी ट्रेनची चेन ओढली. आग लागल्याची अफवा पसरल्यामुळे प्रवाशांनी धावपळ करायला सुरूवात केली आणि दरवाजातून उड्या मारायला सुरुवात केली.

**मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केलं दु:ख**

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेबद्दल दु: ख व्यक्त केलं. जळगाव जिल्ह्यातील पाचोरानजीक एका अत्यंत दुर्दैवी घटनेत काही लोकांचा मृत्यू झाल्याची घटना अतिशय वेदनादायी आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

माझे सहकारी मंत्री गिरीश महाजन तसंच पोलीस अधीक्षक हे घटनास्थळी पोहोचले असून, जिल्हाधिकारी काही वेळात तेथे पोहोचत आहेत. संपूर्ण जिल्हा प्रशासन रेल्वे प्रशासनाशी समन्वयाने काम करीत असून, जखमींच्या उपचारासाठी तातडीने व्यवस्था करण्यात येत आहेत. ८ रुग्णवाहिका रवाना करण्यात आल्या आहेत. सामान्य रुग्णालय तसेच नजीकच्या इतर खाजगी रुग्णालयांना जखमींवर उपचारासाठी सज्ज ठेवण्यात आले आहे. ग्लासकटर, फ्लडलाईट्स इत्यादी आपातकालिन यंत्रणा सुद्धा सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. संपूर्ण स्थितीवर आम्ही लक्ष ठेऊन असून, आवश्यक ती सर्व मदत तातडीने पुरविण्यात येत आहे. मी जिल्हा प्रशासनाच्या संपर्कात आहे.

## जळगावच्या रेल्वे दुर्घटनेमध्ये १२ प्रवाशांचा मृत्यू, जिल्हाधिकाऱ्यांची माहिती

**जळगाव/प्रतिनिधी :** जळगाव आणि पाचोरा दरम्यान पुष्पक एक्सप्रेसच्या काही डब्यांना आग लागल्याची अफवा उडाली त्यामुळे पुष्पक एक्सप्रेस मध्ये असलेल्या नागरिकांनी एक्सप्रेस मधून खाली उड्या मारल्या दुसऱ्या बाजूने कर्नाटका एक्सप्रेस येत होती त्या कर्नाटक एक्सप्रेसच्या खाली प्रवासी आल्यामुळे १२ प्रवाशांचा जीव गमावला आहे , यापैकी काही प्रवाशांची ओळख पटली आहे तर त्यांच्या नातेवाईकांची डीएनए तपासणी करून ओळख पटवण्यात येणार असल्याची माहिती जळगावचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे.



## पाचोऱ्यानजिकची रेल्वे अपघाताची घटना दुर्दैवी; प्रवाशांच्या मृत्यूबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून दु:ख व्यक्त

**मुंबई/प्रतिनिधी :** जळगाव जिल्ह्यातील पाचोरानजिक रेल्वे अपघातात प्रवाशांचा मृत्यू झाल्याची घटना अत्यंत दुर्दैवी आणि वेदनादायी असल्याचे सांगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्याबद्दल दु:ख व्यक्त केले आहे.

अपघाताची घटना कळताच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तातडीने जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधून अपघाताची माहिती घेतली तसेच जखमी प्रवाशांना तातडीची मदत व वैद्यकीय उपचारांची व्यवस्था करण्याचे निर्देश दिले. जलसंपदा मंत्री गिरीश महाजन स्वत: घटनास्थळी पोहचले असून पोलिस अधिक्षकांसह जिल्हा यंत्रणा युद्धपातळीवर बचाव आणि मदतकार्य करीत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दावोस येथून जिल्हा प्रशासनाच्या संपर्कात असून त्यांनी अपघाताची माहिती घेऊन प्रशासनाला मदतकार्यासंदर्भात आवश्यक निर्देश दिले आहेत. जिल्हा प्रशासन आणि रेल्वे यंत्रणा समन्वयातून बचाव आणि मदतकार्य करीत आहे. मदतकार्य रात्रीही सुरु राहणार आहे. त्यासाठी ग्लासकटर, फ्लडलाईट्सह आवश्यक यंत्रणा अपघातस्थळी पोहचली आहे, अशी माहितीही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सार्वजनिक आरोग्य विभागात २२५ पदभरती

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** सार्वजनिक आरोग्य विभागाकडून प्राप्त मागणीपत्रानुसार आरोग्य सेवा संचालनालयांतर्गत जिल्हा शल्य चिकित्सक संवर्ग, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट–अ या संवर्गातील पदभरतीकरीता विहित ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले आहेत.

अर्ज सादर करावयाचा कालावधी

दिनांक २१ जानेवारी, २०२५ रोजी १४.०० ते दिनांक १० फेब्रुवारी, २०२५ रोजी २३.५९,ऑनलाईन पध्दतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याकरीता अंतिम दिनांक १० फेब्रुवारी, २०२५ रोजी २३.५९,भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याची दिनांक १२ फेब्रुवारी, २०२५ रोजी २३.५९,चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरण्याचे दिनांक १३ फेब्रुवारी, २०२५ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेमध्ये. अधिक माहितीसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या संकेतस्थळाला भेट द्यावी

## कागदी, प्लास्टिकचे राष्ट्रध्वज वापरण्यास बंदी

**मुंबई/प्रतिनिधी :** कागदी तसेच प्लास्टिक ध्वज वापरण्यास बंदी असून कापडी राष्ट्रध्वज वापरण्याचे निर्देश आहेत.

२६ जानेवारी, १५ ऑगस्ट, १ मे व इतर राष्ट्रीय कार्यक्रम, महत्वाचे सांस्कृतिक कार्यक्रम व क्रीडा सामन्यांच्यावेळी कार्यक्रम पार पडल्यानंतर खराब झालेले, इतस्ततः पडलेले राष्ट्रध्वज गोळा करुन ते तहसिल कार्यालयात व जिल्हा स्तरावर निर्माण करण्यात आलेल्या सर्व यंत्रणेस सुपूर्द करण्याचे अधिकार अशासकीय संस्था तसेच इतर संघटनाना देण्यात आले आहेत.

मुंबई उपनगर जिल्ह्यासाठी जिल्हा स्तरावर व अंधेरी, बोरीवली तसेच कुर्ला (मुलुंड) या तीन तालुक्यांसाठी तालुका स्तरावर प्लास्टिक व कागदी राष्ट्रध्वजांचा वापर थांबविण्यासाठी जनजागृती करण्याकरिता जिल्हा व तालुका पातळीवर समित्या जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर गठीत करण्यात आल्या असल्याचे उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) मुंबई उपनगर जिल्हा यांनी कळविले आहे.

## मराठवाड्याला कायमस्वरुपी पाणी पुरवठ्यासाठी वॉटर ग्रीड प्रकल्प – मंत्री गुलाबराव पाटील

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठवाड्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी खात्रीशीर व कायमस्वरुपी उपाययोजना म्हणुन मराठवाड्यातील ११ मोठी धरणे पाईपलाईनद्वारे जोडून मराठवाड्यातील सर्व शहरे, गावांना पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी 'मराठवाडा वॉटर ग्रीड' योजना राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून मराठवाड्याला शाश्र्वत पाणी उपलब्ध होणार आहे, असे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितले. तसेच प्रकल्पाच्या उभारणीसाठी जागतिक स्तरावरील बँकांचा सहभाग असणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

'मराठवाडा वॉटर ग्रीड' प्रकल्पाबाबत जागतिक स्तरावरील बँकांच्या प्रतिनिधींसमवेत मंत्रालयात आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे – महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव अभिषेक कृष्णा, 'मित्रा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी, जल जीवन मिशन अभियान संचालक ई रवींद्रन, जलसंपदा विभागाचे सचिव संजय बेलसरे उपस्थित होते. तसेच दूरदृश्यप्रणालीद्वारे अशियन इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बँकेचे राजेश यादव, एशियन डेव्हलपमेंट बँकेचे विकास गोयल, न्यू डेव्हलपमेंट बँकचे बिंदू माधव पांडा, एन रंगनाथ उपस्थित होते.

पाणीपुरवठा मंत्री श्री.पाटील म्हणाले की, मराठवाड्यातील पाणीप्रश्र्नावर कायमस्वरुपी उपाययोजना करणे आवश्यक आहे. 'मराठवाडा वॉटर ग्रीड' प्रकल्पाच्या माध्यमातून मराठवाड्याला दीर्घकालीन स्वरुपात पाणी उपलब्ध होणार आहे. तसेच केंद्र सरकारच्या सूचनेनुसार 'मराठवाडा वॉटर ग्रीड' प्रकल्पाची उभारणी राज्य शासनाने वर्ल्ड बँक, आशियायी विकास बँक यासारख्या बँकांमार्फत कर्ज स्वरुपात निधी उभारणी करुन अंमलबजावणी करण्यात यावी, असे सूचित केले आहे. त्यानुसार 'मित्रा' संस्थेमार्फत अशा जागतिक संस्थांशी समन्वय साधून हा प्रकल्प पुढे नेण्याच्या अनुषंगाने पाठपुरावा करण्यात यावा.

## संत्रावर्गीय फळ पिकाच्या फळगळतीमुळे झालेल्या नुकसानीस विशेष बाब म्हणून १६५ कोटी ८३ लाखाची मदत देण्यास राज्य शासनाची मंजुरी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** वर्धा जिल्ह्यातील आर्वी उपविभागात ऑगस्ट २०२४ मध्ये ढगाळ वातावरण आणि जुलै ते ऑगस्ट २०२४ या कालावधीत अमरावती, अकोला व बुलढाणा जिल्ह्यात ढगाळ वातावरण व सततच्या पावसामुळे संत्रा पिकाच्या फळगळतीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले होते. यास विशेष बाब म्हणून १६५ कोटी ८३ लाख ८ हजाराची मदत देणार असल्याची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव–पाटील यांनी दिली.

नैसर्गिक आपत्तीमुळे शेत पिकांचे नुकसान झाल्याने शेतकरी खचला जातो. या नुकसानग्रस्त शेतकऱ्याला आधार व दिलासा देण्यासाठी शासन त्याच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी सांगितले.

वर्धा जिल्ह्यातील आर्वी उपविभागात ढगाळ वातावरण व सततच्या पावसामुळे ऑगस्ट २०२४ कालावधीत ५ हजार ९३३ शेतकऱ्यांचे ३०१३.८५ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले होते. या नुकसानीपोटी विशेष बाब म्हणून १०८४.९८ लाख रुपये मदत देण्यास मंजुरी दिली आहे.

तसेच, जुलै ते ऑगस्ट २०२४ कालावधीत अमरावती जिल्ह्यातील ४१ हजार ९११ शेतकऱ्यांचे ३७३९३.९७ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले होते. या नुकसानीपोटी विशेष बाब म्हणून १३४६१.८३ लाख रुपये, अकोला जिल्ह्यातील ३ हजार ४३३ शेतकऱ्यांचे ३०२९.५० हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले होते. या नुकसानीपोटी विशेष बाब म्हणून १०९०.६२ लाख रुपये, बुलढाणा जिल्ह्यातील ३ हजार ८५२ शेतकऱ्यांचे २६२६.८० हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले होते. या नुकसानीपोटी विशेष बाब म्हणून ९४५.६५ लाख रुपयांची मदतीस विशेष बाब म्हणून मंजुरी दिली आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंबडवे येथील स्मारकाचा आराखडा तातडीने पाठवावा - महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंबडवे या मूळ गावी होत असलेल्या त्यांच्या स्मारकाचे काम लवकर सुरू होण्यासाठी सामाजिक न्याय विभागाने स्मारक आराखडा तातडीने पाठवावा. हा आराखडा तयार करताना टप्पा एक मधील कामे व टप्पा दोन मध्ये घेण्यात येणारी कामे असा आराखडा तयार करावा, अशा सूचना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिल्या.



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूळ गावी आंबडवे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी येथील स्मारक कामासंदर्भात बैठक झाली. बैठकीस सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, माजी खासदार अमर साबळे, प्रधान सचिव डॉ.हर्षदीप कांबळे, उपसचिव अजित देशमुख, सह सचिव श्री. बागुल, अवर सचिव श्रीमती देशमुख यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. तर कोकण विभागीय आयुक्त व रत्नागिरीचे जिल्हाधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.

महसूल मंत्री श्री. बावनकुळे म्हणाले, स्मारकासाठी खासगी जागा भूसंपादन प्रक्रिया सुरू करावी. भूसंपादन आणि स्मारकाच्या संपूर्ण कामासाठी आवश्यक निधीचा प्रस्ताव द्यावा. स्मारकाची कामे टप्प्याटप्प्याने सुरू करावीत. स्मारक जागेमध्ये येणाऱ्या खासगी घरांना देण्यात येणाऱ्या सानुग्रह अनुदानाचा प्रस्तावाच्या आराखड्यात समावेश करावा, अशा सूचनाही श्री. बावनकुळे यांनी दिल्या.

## मराठी माणसाचा स्वाभिमान जागृत करणारे बाळासाहेब!

आज २३ जानेवारी, हिंदू हृदय सम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांची ९९ वि जयंती. बाळासाहेबांचा जन्म २३ जानेवारी १९२६ रोजी झाला. बाळासाहेबांना समाजकार्याचे बाळकडू आपल्या वडिलांकडून म्हणजे प्रबोधनकारांकडून लहानवयातच मिळाले. प्रबोधनकारांच्या प्रबोधनाचा, पुरोगामी विचारांचा व आक्रमक वृत्तीचा वारसा बाळासाहेबांमध्येही कळत नकळतपणे उतरला. सर्वप्रथम एक कलाकार, एक व्यंगचित्रकार म्हणून त्यांनी सामाजिक प्रश्नांवर भाष्य करण्यास सुरुवात केली. १९५० साली ते फ्री प्रेस जर्नलमध्ये व्यंगचित्रकार म्हणून रुजू झाले. फ्री प्रेस जर्नलमध्ये व्यंगचित्रकार म्हणून काम करत असतानाच बाळासाहेब विविध संस्थांसाठी, कंपन्यांसाठी व नियतकालिकांसाठी व्यंगचित्रकार तसेच जाहिरात डिझाईचे कामही करत. याच काळात त्यांची आर. के. लक्ष्मण या विख्यात व्यंगचित्रकाराशी ओळख झाली. लवकरच या ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले. ही मैत्री शेवट पर्यंत टिकून राहिली. आर. के. लक्ष्मण आणि बाळासाहेब ठाकरे या दोघांनी व्यंगचित्रकलेला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. आज व्यंगचित्रकार म्हटले की याच दोघांची नावे समोर येतात. फ्री प्रेस जर्नलमध्ये काही काळ काम केल्यानंतर बाळासाहेबांनी स्वतःचे साप्ताहिक काढण्याचे ठरवले. बाळासाहेब स्वतः व्यंगचित्रकार होते त्यामुळे हे साप्ताहिक व्यंगचित्रात्मकच होते हे वेगळे सांगायला नको. ऑगस्ट १९६७ साली बाळासाहेबांनी 'मार्मिक' हे साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकाला मार्मिक हे नाव प्रबोधनकारांनी सुचवले. ऑगस्ट १९६७ मध्ये महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते मार्मिकच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन झाले. महाराष्ट्राच्या उद्धारासाठी आणि मराठी माणसाचा स्वाभिमान जागृत करण्यासाठी सुरू करण्यात आलेले मार्मिक आजही तितक्याच जोमात सुरू आहे. बाळासाहेबांनी ज्या उद्देशाने हे साप्ताहिक सुरू केले होते तो उद्देश सफल झाला असेच म्हणावे लागेल. मराठी माणसांच्या मुंबईतच मराठी माणसांवर होणाऱ्या अन्यायाला मार्मिकने वाचा फोडली. महाराष्ट्रातच मराठी माणसांची गळचेपी होऊ लागली. मराठीवर अन्याय होऊ लागला हा अन्याय केवळ व्यंगचित्रांच्या फटकाऱ्याने दूर होणार नाही त्यासाठी आणखी संघटित प्रयत्न करायला हवेत असा विचार बाळासाहेबांच्या मनात आला. बाळासाहेबांनी मराठी मणसांना एक करून मोठे संघटन उभारले. या संघटनेला कोणते नाव द्यायचे असे बाळासाहेबांनी प्रबोधनकारांना विचारले. प्रबोधनकारांनी क्षणाचाही विलंब न करता नाव घेतले 'शिवसेना' यानंतर बाळासाहेबांनी १९ जून १९६६ रोजी शिवसेनेची अधिकृत स्थापना केली. ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण हे ब्रीद घेऊन स्थापन झालेल्या शिवसेनेत तरुणांचा भरणा सुरू झाला. गाव तिथे शाखा असा प्रवास करत अल्पावधीतच शिवसेना महाराष्ट्रभर पसरली. गावागावात, खेड्यापाड्यात शिवसेनेच्या शाखा स्थापन झाल्या. शिवसेनेचा पहिला मेळावा ३० ऑक्टोबर १९६६ रोजी शिवतीर्थ मैदानावर संपन्न झाला. या मेळाव्यापासूम शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि शिवतीर्थावरील ( शिवाजीपार्क ) मराठी माणसांची प्रचंड गर्दी असे समिकरणच तयार झाले. शिवतीर्थावर बाळासाहेबांचे भाषण ऐकण्यासाठी राज्यभरातून लोक येत. त्यांच्या वक्तृत्वाने उपस्थित जनसमुदाय भारावून जात. वक्तृत्वाबरोबरच भेदक लेखणी हे देखील बाळासाहेबांच्या व्यक्तिमत्वाचे महत्वाचे वैशिष्ट्ये. बाळासाहेबांनी सामना सुरू केल्यावर या लेखणीची ताकद देशाला समजली. सामना मधील बाळासाहेबांच्या अग्रलेखांची वाट पूर्ण महाराष्ट्र पाहत असे. १९९५ साली बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्रभर झंझावती प्रचार केला. संपूर्ण महाराष्ट्रात त्यांनी प्रचारसभा घेतल्या. त्यांच्या सभेला लाखोंची गर्दी होऊ लागली. आपल्या आक्रमक भाषणांनी सत्ताधारी पक्षाला त्यांनी सळो की पळो करून सोडले. बाळासाहेबांमुळेच शिवसेना भाजप युतीचे सरकार महाराष्ट्रात स्थापन झाले. मनोहर जोशी मुख्यमंत्री बनले. या सरकारने एक रुपयात झुणका भाकर, वृद्धाश्रमांची साखळी, वृद्धांना सवलती, झोपडपट्टी वासीयांना घरे, मुंबई - पुणे हायवे, मुंबईतील उड्डाणपूल, बॉम्बे चे मुंबई नामांतर असे अनेक लोकहिताचे निर्णय घेतले. या सर्व योजना प्रकल्पांची मूळ संकल्पना बाळासाहेबांचीच होती. आज मुंबई महाराष्ट्रात आहे याचे सर्व श्रेय बाळासाहेबांना जाते. बाळासाहेबांमुळेच मुंबई महाराष्ट्रात आणि मराठी माणूस मुंबईत दिमाखात राहू शकतो. बाळासाहेब नसते तर मुंबई परप्रांतीयांच्या घशात आणि मराठी माणूस मुंबईच्या बाहेर गेला असता. बाळासाहेबांनीच मराठी माणसाला स्वाभिमानाने जगायला शिकवले. बाळासाहेबांमुळेच मराठी माणूस आज ताठ मानेने जगत आहे. मराठी माणसांसाठी त्यांनी जे केले ते इतर कोणत्याही नेत्याला करता आले नाही म्हणूनच मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील. आज त्यांच्या जयंती दिनी महाराष्ट्रातील तमाम मराठी माणूस त्यांना अभिवादन करत आहे. मराठी माणसांच्या मनात स्वाभिमान जागृत करणाऱ्या बाळासाहेबांना विनम्र अभिवादन!

### 'बेटी बचाओ, बेटी पढाओ'च्या दशकपूर्तीनिमित्त सायकल रॅली

# मुलींचा जन्मदर वाढविण्यासाठी व्यापक जनजागृती करा- जिल्हाधिकारी डॉ. पाटील

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील मुलीचा जन्मदराचे प्रमाण वाढविण्यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न होणे आवश्यक आहे. गर्भलिंग निदान, तपासणी, कन्याभ्रूण हत्या, बालविवाह यासारख्या अनिष्ठ प्रथाना आळा घालण्यासाठी 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' या अभियानाची व्यापक प्रमाणात जनजागृती करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले.



जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरामध्ये आज 'बेटी बचाओ बेटी पढाओ' या योजनेस १० वर्षपूर्तीनिमित्त जिल्हा परिषदेच्या महिला व बाल विकास विभागाच्यावतीने सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील व मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांनी हिरवी झेंडी दाखवून सायकल रॅलीला रवाना केले. यावेळी शाळाचे विद्यार्थी, महिला शिक्षक सहभागी झाल्या होत्या.

जिल्हाधिकारी डॉ. पाटील म्हणाले की, मुलींचा घटता जन्मदर ही एक सामाजिक समस्या असून ती सोडविण्यासाठी प्रत्येकाने कटीबद्ध होणे आवश्यक आहे. यासाठी सर्वसामान्य लोकांपर्यंत प्रबोधन, जनजागृती करुन लोकशिक्षण व्हायला हवे. हे आपले प्रत्येकाचे कर्तव्य असून समाजाचे संतुलन साधण्यासाठी महिला व पुरुषांचे प्रमाण योग्य हवे. बेटी बचाओ, बेटी पढाओ ही मोहिम मर्यादेत कालावधीसाठी न राबविता त्यांची व्यापक स्वरुपात अंमलबजावणी करावी, असेही आवाहन त्यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाच्या सुरवातीला उपस्थितांना बेटी बचाओ बेटी पढाओची शपथ देऊन स्वाक्षरी मोहिम राबविण्यात आली. त्यानंतर 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' सायकल रॅली जिल्हाधिकारी कार्यालय येथून सुरु होऊन कारंजा चौक, बोंडे सरकार चौकमार्गे भारत विद्यालय येथे रॅलीचा समारोप झाला. या रॅलीमध्ये जिल्हा परिषदचे अधिकारी, कर्मचारी तसेच भारत विद्यालय, प्रबोधनी विद्यालय, शारदा ज्ञानपीढ व एडेड हायस्कूलच्या विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले होते. 'बेटी बचाओ बेटी पढाओ' या योजनेस १० वर्षपूर्तीनिमित्त विविध विभागामार्फत दि. २४ जानेवारी ते ८ मार्चपर्यंत विविध जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा परिषदचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद एंडोले यांनी दिली.

## मानवी संवेदनेसह सेवा हे टपाल विभागाचे वैशिष्ट्ये

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय टपाल विभागाने आपल्या दीडशे वर्षांहून अधिक काळाच्या वाटचालीमध्ये मानवी संवेदनेसह सेवा देऊन लोकांशी भावनिक नाते जोपासले आहे. हे भावनिक नाते व विश्र्वासाची परंपरा हे डाक विभागाचे बलस्थान असून, आगामी काळात डाक विभाग विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यात महत्त्वपूर्ण योगदान देईल, असा विश्वास राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी व्यक्त केला.

भारतीय डाक विभागाच्या महाराष्ट्र परिमंडळातर्फे आयोजित राज्यस्तरीय डाक तिकीट प्रदर्शनाचे (महापेक्स २०२५) उद्घाटन राज्यपाल राधाकृष्णन यांच्या हस्ते जागतिक व्यापार केंद्र मुंबई येथे झाले, त्यावेळी ते बोलत होते.

कृत्रिम प्रज्ञा तंत्रज्ञानामुळे मुले व युवा वर्ग अंकगणना आणि लेखन कौशल्य विसरण्याचा धोका निर्माण झाला आहे. या पार्श्र्वभूमीवर विद्यार्थी व युवकांना पत्रलेखन, तिकीट संकलन आदी विषयांची गोडी लावण्याचा डाक विभागाचा उपक्रम स्तुत्य असल्याचे राज्यपालांनी सांगितले.

यावेळी राज्यपालांच्या हस्ते नाशिक येथील पांडव लेणी वरील स्थायी सचित्र विरूपण प्रकाशित करण्यात आले, तसेच मूलचंद जी शाह यांच्या जीवनावर आधारित कस्टमाइज्ड माय स्टॅम्पचे अनावरण करण्यात आले.

राज्यपालांच्या हस्ते महापेक्सच्या बोधचिन्हाचे उद्घाटन करण्यात आले तसेच जागतिक व्यापार केंद्र मुंबई, ब्रेल लिपी तसेच डाक सेवा इ सायकल अभियानावर आधारित विशेष आवरणाचे देखील प्रकाशन करण्यात आले.

कार्यक्रमाला महाराष्ट्र व गोव्याचे मुख्य पोस्ट मास्तर जनरल अमिताभ सिंह, जागतिक व्यापार केंद्र मुंबईचे संचालक विजय कलंत्री, टाइम्स ऑफ इंडियाच्या वरिष्ठ अधिकारी भावना रॉय, मानेक शाह, काही देशांचे वाणिज्यदूत व देशाच्या विविध भागातून आलेले पोस्ट तिकीट संग्राहक उपस्थित होते. महापेक्स हे प्रदर्शन ४ दिवस सुरु राहणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## विश्व मराठी संमेलनात प्रकाशक, ग्रंथविक्रेते आणि संस्थांनी सहभाग घेण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठी भाषा विभागातर्फे ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयात विश्व मराठी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. अभिजात मराठी ही या विश्व मराठी संमेलनाची मध्यवर्ती संकल्पना असून त्याअनुषंगाने या कालावधीत विविध भाषा विषयक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहेत. यामध्ये प्रकाशक, ग्रंथविक्रेते आणि संस्था यांनी सहभाग घ्यावा असे आवाहन राज्य मराठी विकास संस्थेमार्फत करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यामध्ये विविध प्रकाशन संस्था, ग्रंथविक्रेते तसेच मराठी भाषा आणि संस्कृती यासंबंधी वेगवेगळे उपक्रम करणाऱ्या संस्था यांना त्यांची पुस्तके/उत्पादने यांच्या प्रदर्शन/विक्री करिता दालने उपलब्ध करून देण्यात येतील.

या विश्व मराठी संमेलनात ग्रंथ/पुस्तके/उत्पादने यांच्या प्रदर्शन/विक्रीकरिता सहभाग घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. दि.२५ जानेवारी पर्यंत अर्ज project3.rmvsgmail.com या इ-पत्त्यावर पाठवावे. काही ग्रंथ दालने शासकीय विभागांसाठी राखीव असतील. दालनांचे वितरण / वाटप अधिकार दालन समितीकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.

तरी इच्छुक प्रकाशक, ग्रंथविक्रेते आणि संस्था यांनी या संधीचा लाभ घ्यावा व आपला सहभाग नोंदवावा. प्रदर्शनास उपस्थित राहणाऱ्या दोन प्रतिनिधींच्या आधार कार्डची छायाप्रत, आपल्या प्रकाशनाचे नाव, इ-पत्ता, संपर्क क्रमांकासहीत project3.rmvsgmail.com या इ-पत्त्यावर पाठवावीत. अधिक माहितीसाठी राज्य मराठी विकास संस्थेच्या श्रीमती सुरेखा कांबळे-साळवे संपर्क क्र. ८२९१७९५४८५ श्री. निलेश यादव संपर्क क्र ७७१०८९९७०४ यांच्याशी संपर्क साधावा, असे राज्य मराठी विकास संस्थेतर्फे कळविण्यात आले आहे.

## 'हेरा फेरी ३' च्या शूटिंगला कधी होणार सुरुवात?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूडचा खिलाडी कुमार अर्थात अक्षय कुमार हा गेल्या काही दिवसांपासून बॉक्स ऑफिसवर काही चांगली कामगिरी करत नाहीये. त्याचे चित्रपट हे आधी चांगलेच चर्चेत राहायचे. गेल्या दोन-तीन वर्षांमध्ये अभिनेत्याचे चित्रपट बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करत नसल्याचे दिसून येत आहे. तर 'भूल भुलैया' ची फ्रँचायझीमध्ये देखील तो दिसला नाही. ज्यात त्याला पाहण्यासाठी सगळेच प्रेक्षक उत्सुक होते. त्याची जागा अभिनेता कार्तिक आर्यननं घेतली. खरंतर, त्यानं याचं कारण सांगितलं आहे की तो चित्रपटात का दिसला नाही. त्यासोबत 'हेरा फेरी ३' ला घेऊन त्यानं एक मोठी अपडेट शेअर केली आहे.

अक्षय कुमार त्याचा आगामी चित्रपट स्काय फोर्सच्या प्रमोशन दरम्यान, बोलताना 'भूल भुलैया' ची फ्रँचायझीविषयी बोलला. अक्षयच्या या आगामी चित्रपटांना पाहण्यासाठी प्रेक्षक आतुर असले तरी देखील त्यांना अक्षयला कॉमेडी करताना पाहायचं आहे. यावेळी चाहत्यांना अक्षय कुमारला विविध प्रश्न्न विचारले. एका चाहत्यानं अक्षय कुमारला सांगितलं की तो 'भूल भुलैया २' आणि 'भूल भुलैया ३' मध्ये नसल्यानं त्यानं हे दोन्ही चित्रपट पाहिले नाही. तर चाहत्यानं केलेल्या या वक्तव्यावर उत्तर देत सांगितलं की 'बेटा, मला त्यातून काढून टाकण्यात आलं.'

त्यानंतर अक्षय कुमार 'हेरा फेरी ३' विषयी अपडेट देत म्हणाला, 'मी हेरा फेरी ३ ची शूट सुरु करण्यासाठी उत्सुक आहे. मला माहित नाही, पण जर सगळं काही ठीक असलं तर यावर्षी चित्रपटाचं शूट हे सुरु होईल. जेव्हा आम्ही हेरा फेरी सुरु केली तेव्हा आम्हाला माहित नव्हतं की हा इतका कल्ट सिनेमा होईल. पण जेव्हा मी चित्रपट पाहिला तेव्हा माझ्या हे लक्षातच आलं नाही की हो हा चित्रपट इतका मजेशीर आहे. पण आमच्यापैकी कोणत्याही व्यक्तीला ही अपेक्षा नव्हती की बाबू भैया, राजू आणि श्यामच्या भूमिका या कल्ट होतील.' दरम्यान, आता 'हेरा फेरी ३' कधी पाहायला मिळणार यासाठी सगळेच उत्सुक आहेत.

## केईएम शताब्दी समारोह : केईएम रुग्णालय मुंबईकरांचे आधारवड

### झिरो प्रिस्किप्शन पॉलिसी लागू करावी : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : :** रुग्णसेवेचे अखंड व्रत घेतलेले केईएम रुग्णालय हे मुंबईकरांचे खऱ्या अर्थाने आधारवड आहे. ज्या विश्र्वासाने रुग्ण येथे येतात त्यांना जागा कमी पडू नये यासाठी केईएममध्ये आयुष्मान शताब्दी टॉवर उभे करावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

अविरत रुग्णसेवेची शंभर वर्ष पूर्ण करणाऱ्या आणि लाखो रुग्णांना जीवनदान देणाऱ्या केईएम रुग्णालयाच्या चरणी मी नतमस्तक होतो, अशी भावना उपमुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी आज केईएम रुग्णालयाच्या शतक महोत्सवी समारंभात व्यक्त केली.

सेठ गोवर्धनदास सुंदरदास वैद्यकीय महाविद्यालय आणि केईएम रुग्णालयाच्या ९९ वा वर्धापन दिन सोहळा रुग्णालयाच्या प्रांगणात झाला. त्यावेळी उपमुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. यावेळी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, आमदार कालिदास कोळंबकर, सुनील शिंदे, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, अतिरिक्त आयुक्त विपिन शर्मा, केईएमच्या अधिष्ठाता डॉ. संगीता रावत आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यावेळी म्हणाले की, केईएमने घेतलेले रुग्णसेवेचे व्रत अवघड आहे. आजही इथली रुग्णसेवा अहोरात्र चालू आहे. इथल्या डॉक्टरांचे, नर्सेसचे, कर्मचाऱ्यांचे आभार मानावे तेवढे कमी आहेत. तुम्ही आहात, म्हणून सामान्य मुंबईकर आज जगतो आहे, असे गौरवोद्गार उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी काढले.

सेवाभाव हा परमभाव आहे, असे आपली संस्कृती सांगते. डॉक्टर देखील वैद्यकीय क्षेत्रात येताना सेवाधर्माची शपथ घेतात. ही शपथ घेऊनच ९९ वर्षांपूर्वी हे हॉस्पिटल उभे राहिले. आजही मुंबई आणि आसपासच्या रहिवाशांना आधार देत उभे आहे, असेही श्री. शिंदे यावेळी म्हणाले.

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, घरातल्या आधारवडासारख्या बुजुर्ग व्यक्तीबद्दल आपल्याला आदरभाव असतो. आपुलकी असते, तशीच भावना केईएम बद्दल आहे. एखाद्या आरोग्य क्षेत्रातील संस्थेनं सुवर्ण किंवा शताब्दी महोत्सव साजरा करणे ही त्या संस्थेसाठी अभिमानास्पद बाब असते. आज केईएम रुग्णालय हे देशातील सर्वोत्तम रुग्णालयांपैकी एक आहे. केईएम हे कुटुंब आहे. त्यामध्ये प्रत्येक व्यक्तीची काळजी घेतली जाते. सांस्कृतिक वारसा जपत अत्याधुनिकतेची कासही केईएमने धरलीये. आरोग्य क्षेत्राच्या नव्या दिशा आणि आंतरराष्ट्रीय मानके केईएमने स्थापित केली असल्याचे त्यांनी सांगितले.

केईएम सारखी रुग्णालये ही सर्वसमान्यांसाठी देवदूतासारखी आहेत. अरुणा शानबाग यांची ४१ वर्षे सेवा केईएमच्या कर्मचाऱ्यांनी केली.जगातल्या कुठल्याही हॉस्पिटलमध्ये रुग्णसेवेचे असे उदाहरण नसेल. केइएमसोबत नाव येते ते जीएस वैद्यकीय महाविद्यालयाचे कितीतरी नामवंत, दिग्गज डॉक्टर या कॉलेजच्या प्रांगणात तयार झाले. इथल्या डॉक्टरांची संशोधकांची कीर्ती जगभर पसरलेली असल्याचे गौरवोद्गार उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी काढले.



भारतातील पहिली हृदय शस्त्रक्रिया केईएम रुग्णालयात १९६८ मध्ये झाली. त्यानंतर २०२४ रोजी यशस्वी हार्ट ट्रान्सप्लाण्ट येथे करण्यात आले. अवयवदानामध्ये वाखाणण्यासारखे कार्य केल्याबद्दल केईएम रुग्णालयाचा काही दिवसांपूर्वीच दिल्लीत गौरव करण्यात आला. भारतातील पहिली टेस्ट ट्युब बेबीही केईएम रुग्णालयात १९८७ साली डॉ. इंदिरा हिंदुजा यांनी घडवली आणि आता इथे रोबोट या अत्याधुनिक तंत्रज्ञानामार्फत गुडघ्याच्या सांधेबद्दल शस्त्रक्रिया करण्यात येतात. वैद्यकीय क्षेत्रात केईएमने केलेली ही क्रांती ऐतिहासिक असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

केईएमच्या शताब्दी महोत्सवानिमित्त महानायक अमिताभ बच्चन यांच्याहस्ते फॅटी लिव्हरवरील उपचाराच्या क्लिनीकचे उद्घाटन झाले. ते या आजाराच्या जनजागृतीसाठी ब्रॅण्ड अम्बॅसिडर म्हणून काम करणार आहेत.त्याबद्दल अमिताभ बच्चन यांचे शासनाच्यावतीने आभार मानतो. केईएमचे शताब्दी महोत्सव वर्षे पुढील पिढीसाठी खुप काही देण्यासाठी पायाभरणीचे ठरेल, यात तीळमात्र शंका नाही, असेही ते म्हणाले.

रुग्णालयात झिरो प्रिस्किप्शन पॉलिसी लागू करावी त्याचबरोबर रुग्णांना जागा कमी पडू नये यासाठी शताब्दी महोत्सवी वर्षात आयुष्मान टॉवर उभे करतानाच रुग्णाच्या नातेवाईकांची परवड होवू नये यासाठी व्यवस्था निर्माण करण्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले. याठिकाणी डॉक्टरांचे म्युझियम करण्यात यावे अशी सूचनाही त्यांनी केली. यावेळी उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते स्मरणिकेचे आणि वार्षिक अहवालाचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात राज्यगीताने तर समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### शहरातील विविध समस्यांसंदर्भात ठाकरे गटाने केडीएमसी आयुक्तांची घेतली भेट



दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** शहरातील मुख्य चौकात झेब्रा क्रॉसिंग नाही, फेरीवाल्यांचा त्रास, दुर्गाडी किल्ले परिसराची स्वच्छता आणि प्लास्टिक विरोधात कडक कारवाई करण्यात यावी या विविध मुद्यांवर शिवसेना ठाकरे गटाचे उपनेते विजय साळवी यांच्या नेतृत्वात पदाधिकाऱ्यांनी केडीएमसी आयुक्तांची भेट घेतली. या समस्यांमुळे नागरीकांना किती त्रास होत आहे हे त्यांनी या बैठकीत आयुक्तांना सांगितले. लवकरात लवकर या समस्या सोडवण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

### गेल्या २० दिवसांत कल्याण डोंबिवलीत अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या १३ आरोपींना अटक



दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** कल्याण डोंबिवलीत नशेखोरांच्या विरोधात पोलिसांची धडक कारवाई सुरु आहे. २० दिवसात अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या १३ आरोपींना अटक करण्यात आली असून एकूण ८ गुन्हे विविध पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आले आहेत. कल्याणच्या डीपीसी स्कॉडने एमडी ड्रग्ज आणि गांजा तसेच कोडीन युक्त बाटल्या मिळून ३ लाख ६० हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे. नशा करणाऱ्या तरुणांकरीता जनजागृतीचे कार्यक्रम ठिकठिकाणी आयोजित केले जात आहेत.

### तापी नदीवरुन अवैध गौण खनिज वाहतूक करण्याच्या दृष्टीने उभारलेला माती बांध महसूल विभागाने केला उध्वस्त





दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** चोपडा तालुक्यातील अनवर्दे आणि घाडवेल नदीपात्रा जवळ तसेच अमळनेर तालुक्यातील खापरखेडा गंगापूर नदीपात्राजवळ काही व्यक्तींनी अवैध रेती उत्खनन साठी माती बांध तयार केला होता तो गेल्या आठवड्यात प्रांताधिकार्यांच्या मार्गदर्शनाखाली उध्वस्त केला होता. परंतु त्याला शनिवार रविवार सुट्टी साधून पुन्हा निर्माण केला होता नदीपात्रातून अमळनेर व चोपडा तालुक्यातील गावांमध्ये वाहतूक करण्याचा उद्देश होता परंतु आज चोपडा तहसीलदार भाऊसाहेब थोरात नायब तहसीलदार मंडळाधिकारी व अमळनेर तहसीलदार व त्यांचे मंडळाधिकारी संयुक्तपणे कारवाई करून आज तो पुल पुन्हा उध्वस्त केला आहे तसेच दुसरी कारवाईत अकुलखेडा येथे ओवर लोड असलेल्या दोन टिपर पकडल्याचे तहसीलदार भाऊसाहेब थोरात यांनी सांगितले.

### शंभर दिवसाच्या सात कलमी कार्यक्रमाचा जिल्हाधिकारी राऊत यांनी घेतला आढावा

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** प्रशासकीय सुधारणांसाठी मुलमंत्र ठरू पाहणाऱ्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शंभर दिवसांच्या सात कलमी कार्यक्रमाचा जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी आज आढावा घेतला. महसूल विभागाचे जिल्ह्यातील सर्व प्रमुख तसेच सर्व उपविभागीय अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

यावेळी त्यांनी या मोहिमेत मागे राहिलेल्या विभागांना सक्त निर्देश देत निर्धारीत वेळेत काम पूर्ण करण्याचे स्पष्ट केले. प्रामुख्याने वेबसाईटचे अद्यावतीकरण, इज ऑफ लिव्हिंग, स्वच्छता, तक्रार निवारण, सोईसुविधा, गुंतवणूकीस प्रोत्साहन, क्षेत्रिय भेटी या ७ सूत्रांवर त्यांनी भर दिला. या बैठकीला अप्पर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यासह उपविभागीय अधिकारी उपस्थित होते.

# भारतपर्व महोत्सवात असणार महाराष्ट्राचा ‘मधाचे गाव’ संकल्पनेवर आधारित चित्ररथ

**नवी दिल्ली** : लाल किल्ला परिसरात भारत पर्व महोत्सवाचे आयोजन प्रजासत्ताक दिनानिमित्त होणार असून या महोत्सवास महाराष्ट्र राज्याचा ’मधाचे गाव’ या संकल्पनेवर आधारित चित्ररथ असणार आहे.

दरवर्षी केंद्रीय पर्यटन मंत्रालयाच्यावतीने लाल किल्ला येथे भारतपर्व महोत्सवाचे आयोजन प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्यानिमित्त केले जाते. यावर्षी या महोत्सवात महाराष्ट्राचा चित्ररथ दर्शविण्यात येणार आहे. महाराष्ट्रासह बारा राज्यातील चित्ररथ ही इथे असणार आहेत. दिनांक २६ ते २९ जानेवारी दरम्यान भारतपर्व महोत्सव चालेल.

हे वर्ष संविधानाचे अमृत महोत्सव वर्ष म्हणून साजरे केले जात असून, यावर्षी चित्ररथांसाठी ’सुवर्ण भारत: वारसा आणि विकास’ ही मध्यवर्ती संकल्पना आहे. या संकल्पनेच्या आधारावर महाराष्ट्र राज्याने ’मधाचे गाव’ असा चित्ररथ तयार केला.

मधमाशांचे पर्यावरणाच्या आणि मानवी जीवनाच्या दृष्टिकोनातून खूप महत्त्व आहे.मधाचे व्यावसायिक महत्त्व







लक्षात घेऊन, स्थानिक रोजगार निर्मिती आणि उत्पन्नाचे स्रोत निर्माण करण्यासाठी, महाराष्ट्र शासनाने २०२२ मध्ये ’मधाचे गाव’ ही योजना सुरू केली. या योजनेचा मुख्य उद्देश स्थानिक रोजगार निर्मिती करणे आणि गावे आर्थिक दृष्ट्या सक्षम करणे हा आहे. त्याचबरोबर पर्यटन व पर्यावरण यासाठीही ही योजना महत्त्वाची आहे.

असा असेल ’मधाचे गाव’ चित्ररथ

चित्ररथाच्या पुढच्या भागात फुलांनी सजवेलेली मधमाशीचे आकर्षक शिल्प बसवले आहे. या मधमाशीभोवती लहान मधमाशा आणि काही फुले दाखवली आहेत. भव्य मधमाशीच्या पंखांची हालचाल दाखवण्यात आली असून लहान मधमाशा हवेत उडताना दिसतील.

चित्ररथाच्या मागील भागात एक विशाल मधमाशाचे पोळ चित्रित करण्यात आले आहेत. नैसर्गिकरित्या असणा-या मधुमाशींच्या पोळची अचूक प्रतिकृती बनविली आहे. मधमाशा त्यांच्याभोवती फिरताना दिसतात. मध उत्पादनाचे टप्पे मोठ्या मधाच्या पोळ जवळ दाखवले आहेत. मध व्यवसायातील महत्त्वपूर्ण उप-उत्पादने देखील दर्शविली आहेत. फुलांच्या परागीकरणातून रस शोषुन घेणाऱ्या मधमाशी प्रतिकृती दर्शविण्यात आली आहे. मध निर्मितीच्या विविध टप्प्यातील प्रक्रिया दर्शविण्यात आले आहेत. मधमाशीपालनात वापरल्या जाणाऱ्या खोक्यांवर मधाचे गाव योजनेत समाविष्ट असलेल्या काही गावांची नावे लिहिली आहेत.

सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांच्या मार्गदर्शनातून हा चित्ररथ तयार झाल्याची माहिती सांस्कृतिक विभागाचे संचालक विभीषण चवरे यांनी दिली आहे.

### राज्यपाल आज परभणी दौऱ्यावर; नांदेड विमानतळावर आगमन व प्रस्थान

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन हे उद्या २३ जानेवारी २०२५ रोजी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी येथे दीक्षांत समारंभासाठी येत आहेत. ते नांदेड विमानतळावरून सकाळी ११ वा. परभणीला प्रयाण करतील.

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन उद्या सकाळी ९.४० वा. मुंबई येथून नांदेडकरीता निघतील. नांदेडला सकाळी ११ वा. पोहचल्यानंतर हेलिकॉप्टरने ते परभणी विद्यापिठाच्या हेलिपॅडसाठी रवाना होतील. सकाळी ११.३५ वा. विद्यापीठ हेलिपॅडवर त्यांचे आगमन होईल. दुपारी १२ वा. ते दीक्षांत समारंभाला उपस्थित राहतील. दुपारी २.३० वा. ते परभणी विद्यापीठाच्या हेलिपॅडवरून नांदेडकडे प्रयाण करतील. नांदेड विमानतळ येथे दुपारी २.५५ वा. आगमन झाल्यानंतर लगेच दुपारी ३ वाजेच्यासुमारास ते विमानाने मुंबईकडे प्रयाण करतील.

### महामार्गांवर महिला प्रवाशांसाठी प्राधान्याने सुविधांयुक्त प्रसाधनगृहांची व्यवस्था करावी

सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :**पराज्यभरात विविध महामार्गांवरुन लांब पल्ल्याचा प्रवास करताना प्रवाश्यांसाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. यामध्ये प्राधान्याने महिला प्रवाश्यांसाठी सुविधांयुक्त प्रसाधनगृहांची व्यवस्था उपलब्ध करुन देणारी यंत्रणा कार्यान्वित करण्याच्या सूचना सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून) शिवेंद्रसिंह भोसले यांनी दिल्या.

महामार्गांवरील महिला प्रसाधनगृहांच्या सुविधांबाबत मंत्रालय येथे आढावा बैठक झाली. यावेळी महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव सदाशिव साळुंखे (रस्ते), सचिव संजय दशपुते (बांधकामे) यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.भोसले म्हणाले, महिला प्रवाश्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने महामार्गांवरील पेट्रोलपंपांच्या शेजारी, टोल नाक्याजवळ किंवा इतर सुयोग्य ठिकाणी सुविधांयुक्त प्रसाधन गृहांची व्यवस्था उभारण्यास प्राधान्य द्यावे. तसेच २५ किमीच्या रस्त्यांच्या कामांच्या प्रस्तावांमध्येच या बाबींचा समावेश करावा. सर्व स्वच्छतागृहांची रचना एकसारखी ठेवावी. त्याचप्रमाणे प्रसाधनगृहांच्या येथे कटाक्षाने स्वच्छता राखण्यात यावी. आवश्यक प्रमाणात लाईटची व्यवस्था ठेवली जावी. सुरक्षेच्या दृष्टीने प्रसाधन गृहांच्या परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत. या सर्व बाबींची पूर्तता करण्याच्या दृष्टीने प्रसाधन गृहांची व्यवस्थापन यंत्रणा महिला बाल विकास विभागाच्या सहकार्याने कार्यान्वित करण्यात यावी. स्थानिक महिला बचतगटांना व्यवस्थापनाचे काम सोपवण्यात यावे, जेणेकरुन नियमितपणे प्रसाधनगृहांची स्वच्छता राखण्याचे काम नियंत्रित केले जाईल, असे श्री. शिवेंद्रसिंह भोसले यांनी सूचित केले.

महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी महिला व बाल विकास विभागाकडून महिला बचतगटांना या कामात सहभागी करुन घेता येईल, असे सांगितले.

# पुणे महानगरपालिकेत थकीत मालमत्ता करावरील शास्ती माफीचा प्रस्ताव सादर करावा

## नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांचे निर्देश

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** पुणे शहर महानगरपालिकेमध्ये नवीन ३४ गावांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. मनपा अंतर्गत थकीत मालमत्ता करावरील शास्ती माफ करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे निर्देश नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले.



मंत्रालयात पुणे महानगरपालिका, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या विविध विषयांबाबत बैठक राज्यमंत्री श्रीमती मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली. बैठकीस नगर विकास विभागाचे प्रधान सचिव असीमकुमार गुप्ता, एस गोविंदराज, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी योगेश म्हसे, पुणे महानगरपालिका आयुक्त राजेंद्र भोसले, नगररचनाकार प्रतिभा भदाणे आदींसह अधिकारी उपस्थित होते.

नगरविकास राज्यमंत्री श्रीमती मिसाळ म्हणाल्या, मालमत्ता कराच्या थकबाकीची वसूली करताना निवासी आणि व्यावसायिक असे वर्गीकरण करण्यात यावे. थकीत कर प्रलंबित राहिल्यास त्यावर दंडाची रक्कम वाढते. त्यामुळे मालमत्ताधारकांना अधिकचा बोझा बसेल. पुणे शहरात लष्करी छावणीचा भाग आहे. या भागाचा पुणे महानगरपालिका क्षेत्रात सहभाग करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात यावा. लष्करी छावणीचा महानगरपालिकेत समावेश झाल्यास तेथील मनुष्यबळाचा उपयोग होईल. तसेच सर्वांगिण विकासाला अधिक चालना मिळेल.


पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागात अत्यावश्यक वैद्यकीय सेवेत एकत्रित मानधनावर १६८ सेवक कार्यरत आहेत. या सेवकांना सामावून घेण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी. सफाई कामगार वारसा हक्क भरतीवरील स्थगिती उठविण्यात आली असून याबाबत सामाजिक न्याय विभागाशी चर्चा करून शासन निर्णय काढण्यात यावा. पुणे शहरातील वृक्षांची संख्या, आवश्यक वृक्ष संख्या याबाबत पुणे शहरात वृक्ष गणना करण्यात यावी, अशा सूचनाही राज्यमंत्री श्रीमती मिसाळ यांनी दिल्या.

पुणे मनपा व पीएमआरडीएने बांधकाम परवानगी देताना बांधकाम शुल्कातील ५० टक्के हिस्सा संबंधित यंत्रणेला त्याचवेळी मिळण्यासाठी ऑनलाईन पेयमेंट व्यवस्थेत बदल करावा. हिलटॉप आणि हिलस्लोप जमिनींच्या आरक्षणाबाबत समिती करण्यात यावी. यामध्ये प्रकरणनिहाय आढावा घेण्यात यावा. पुणे शहरातील प्रकल्प बाधीत नागरिकांना कायमस्वरूपी घरे देण्यात यावी. कुठल्याही परिस्थितीत प्रकल्पग्रस्त नागरिकांवर अन्याय होणार नाही, याची काळजी घ्यावी. हिल टॉप, हील स्लोप आणि बी. डी. पी बाबत निर्णय घेण्यात यावा. पर्वती टेकडी लगतची झोपडपट्टी पुनर्वसनासाठी सर्वंकश योजना करण्यात यावी. या भागातील हेरीटेजची अट शिथील करून इमारत उंचीवरील मर्यादा हटविण्याबाबतची कार्यवाही करण्याच्या सूचनाही राज्यमंत्री श्रीमती मिसाळ यांनी दिल्या.

# आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मानाचे स्थान न दिल्यास रिपाई (आठवले गट) ठामपाची निवडणूक स्वबळावर लढणार

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीत रिपाईने महायुतीला प्रचंड मदत केली आहे. त्यामुळेच महायुतीला बहुमत मिळाले आहे. मात्र रिपाईवर अन्यायच केला जात आहे. त्यामुळेच आगामी ठामपा निवडणुकीत मानाचे स्थान न दिल्यास एकूण जागांपैकी १०% जागा स्वबळावर लढणार आणि महायुतीला धडा शिकवणार, असा इशारा रिपाई आठवले गटाचे राष्ट्रीय सरचिटणीस सुरेश बारसिंगे यांनी दिला आहे. ठाण्याच्या शासकीय विश्रामगृहात बुधवारी रिपाइंच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.



या प्रसंगी नवनियुक्त ठाणे प्रदेशाध्यक्ष अण्णा रोकडे, ठाणे प्रदेश कार्याध्यक्ष महेंद्र गायकवाड, प्रदेश सरचिटणीस बाळाराम गायकवाड, ठाणे जिल्हाध्यक्ष भास्कर वाघमारे, सरचिटणीस प्रमोद इंगळे, प्रल्हाद मगरे आदी उपस्थित होते. सुरेश बारसिंगे म्हणाले की, ठाणे जिल्ह्यात महायुतीला घवघवीत यश मिळाले आहे. या यशामागे आमच्या कार्यकर्त्यांकडून केलेली मेहनत आहे. मात्र, आम्हाला सत्तेत वाटा मिळालेला नाही. सत्तेत वाटा मिळावा, यासाठी आम्ही मुख्यमंत्र्यांसह दोन्ही उपमुख्यमंत्र्यांची भेट घेणार आहोत. त्यानंतरही जर आम्हाला सत्तेत वाटा मिळाला नाही तर आम्ही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढवणार आहोत. त्यासाठी फक्त आरक्षितच नव्हे तर खुल्या जागांवरही निवडणुका लढवून प्रस्थापित पक्षांना धक्का देऊ. उमेदवार निवडताना बहुजन समाजाला अधिक प्राधान्य दिले जाईल, असेही बारसिंगे यांनी सांगितले. दरम्यान, सोमनाथ सुर्यवंशी संशयास्पद मृत्यूप्रकरणी कारवाई करण्यासाठी लाँग मार्च काढण्यात येत आहे. या मोर्चात रिपाइंचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहतील, असेही ते म्हणाले आहेत.

## विविध वृत्त...

### माहितीचा अधिकार मध्ये मागितलेली माहिती देण्यास टाळाटाळ केल्याने आमरण उपोषण

दैनिक आपला विदर्भ



**डोणगाव/प्रतिनिधी :** डोणगाव ग्रामपंचायत मध्ये दिनांक १४/ऑक्टोबर/२०२४ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कायद्याअंतर्गत डोणगाव ग्रामपंचायती मध्ये कचरा कुंडी बाबतीत व १५व्या वित्त आयोगाच्या पूर्ण खाते उतारा चा संपूर्ण सविस्तर तपशील मागीतल परंतु डोणगाव ग्रामपंचायत चे विद्यमान ग्रामसेवक यांनी कोणत्याही प्रकारची माहिती दिली नाही बागवान यांनी दिनांक १६/डिसेंबर/२०२४ रोजी विस्तार अधिकारी अधिकारी यांच्या कडे अपिल अर्ज केला तरी सुद्धा संबंधित अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची माहिती किंवा आदेश काढला नाही या वरुन ग्रामपंचायती मध्ये काहीतरी गोड बंगाल झाल्याचे दिसून येते आहे माहिती देण्यास टाळाटाळ करणे सत्य माहीती दडविणे या विरोधात दिनांक २५/जानेवारी/२०२५ रोज शनिवार पासून मेहकर येथील पंचायत समिती गटविकास अधिकारी यांच्या कार्यालया समोर मो. राकिब बागवान आमरण उपोषणाला बसणार आहेत असे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

### वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट-उमरेड मार्गावर अज्ञात वाहनाच्या धडकेत वाघीणीचा बछड्याचा मृत्यू



दैनिक आपला विदर्भ

**वर्धा/प्रतिनिधी :** वर्धा जिल्ह्यातील समुद्रपुर तालुक्यातील हिंगणघाट उमरेड मार्गावर धोंडगाव जवळ रस्ता पार करताना अज्ञात वाहनाच्या धडकेत वाघिणीचा बछडा ठार झाल्याची घटना पहाटे ५ वाजता घडली. घटनेची माहिती मिळताच वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी दाखल होऊन वाघाणीच्या बछड्याचा मृतदेह गिरड येथील कार्यालयात आणून त्या ठिकाणी शवविच्छेदन करून त्याला तिथे अग्नी देण्यात आली. यावेळी मोठ्या संख्येने वनविभाचे अधिकारी, कर्मचारी, डॉक्टर उपस्थित होते. गेल्या काही दिवसांपासून या परिसरात वाघाणीचा ४ पिल्लांसह वावर आहे यातील एका पिल्लाचा आज अपघाती मृत्यू झाला आहे.

### राष्ट्रध्वज अवमान प्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल;उपवन अधिकारी कार्यालयातील घटना



दैनिक आपला विदर्भ



**बुलडाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा येथील उपवनसंरक्षक यांच्या कार्यालयाच्या परिसरात राष्ट्रध्वजाचा अवमान झाल्याने बुलढाणा शहर पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. राष्ट्रध्वज अवमान कायदा १९७१ नुसार कलम २ नुसार गुन्हा दाखल . एड.सतीश रोठे यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल , पोलिसांनी तपास सुरू केलाय..वन विभागाने तातडीने दखल घेत एका वन अधिकारीकडे तपास दिला असून दोषीवर कारवाई करण्यात येईल अशी प्रतिक्रिया उपवन प्रादेशिक अधिकारी यांनी दिली आहे..

### महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळामार्फत विविध पदासाठी पदभरती

**बुलडाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या. (मेस्को) पुणे यांच्यामार्फत विविध पदासाठी पदभरती करण्यात येणार आहे. याकरीता गरजू माजी सैनिकांनी दि. २७ जानेवारी २०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज करावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या. (मेस्को) पुणे यांच्यामार्फत दि. १२ जानेवारी रोजी जाहिरात प्रकाशित करण्यात आली होती. त्यामध्ये महासैनिक औद्योगिक वसाहत भोसरी येथे प्रकल्प व्यवस्थापक(एक पद), क्षेत्रीय व्यवस्थापक नागपूर (एक पद), व्यस्थापकीय मेस्को मुख्यालय पुणे (एक पद), व्यस्थापक लेखा मेस्को मुख्यालय पुणे(एक पद) आहे. यासर्व पदासाठी उमेदवार सशस्त्र सेना दलातील माजी सैनिक असावा. तसेच वयाबाबतचा निर्णय व्यवस्थापकीय मंडळाचा असेल. जाहिरातीमधील अटी व शर्तीमध्ये काही बदल झालेला नसून अर्ज करावायाचा नमुना मेस्कोच्या वेबसाईट www.mescoltd.co.in वर उपलब्ध आहे.

# बुलढाण्यात एलसीबी पथकाकडून तीन गुन्ह्यांची उकल तर एका गुन्ह्यातील आरोपींवर मोक्का अंतर्गत कारवाई


दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** अज्ञात आरोपींनी तक्रारदाराकडे फेसबुक व मोबाईलद्वारे संपर्क साधून कमी दरात तांब्याचे तार स्क्रॅप विक्री करायचे आहे असे सांगून निमगाव शिवारात बोलून त्याच्याकडील सोन्याची चैन हिऱ्याची अंगठी मोबाईल आणि मोबाईलद्वारे ४० हजार रुपये ट्रान्सफर करून व त्यांच्या सोबत असलेल्या नातेवाईकाच्या गळ्यातील सोन्याची चैन मोबाईल फोन असा एकूण नऊ लाख दहा हजार रुपयांचा मुद्देमाल दहा ते बारा चोरट्यांनी चोरला होता.


या गुन्ह्यात टोळीप्रमुख आरोपी संतोष शामराव सोनवणे यासह अकरा जणांना अटक करून मोक्का अंतर्गत कारवाई करत मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे तर जिल्ह्यातील घरफोडी, जबरी चोरीच्या, सोनाराचे दुकानातील सोन्या-चांदीचे दागीण्याची चोरी



गुन्ह्यांची गंभीर दखल घेवून फिर्यादी आदित्य अजितकुमार संचेती, व्यवसाय सराफा व्यापारी, राहणार लोणार यांचे सुलतानपुर येथे दर्शन ज्वेलर्स नावाचे दुकान असून ते दिनांक ११/१०/२०२४ चे सायंकाळच्या सुमारास दुकान बंद करुन सोन्याचे दागिने व नगदी रोख रक्कम एका बंग मध्ये घेवून टु व्हीलर मोपेड गाडीने लोणार येथे घरी जात असताना सुलतानपुर ते लोणार रोड शारा गावाजवळील वळणावर तीन अज्ञात इसम हे मोटार सायकल घेवून आले व त्यांनी त्यांचे ताब्यातील टु व्हीलर गाडी फिर्यादीच्या गाडीला आडवी लावून फिर्यादी यांना मारहाण करुन त्यांच्या जवळ असलेल्या बॅग मधील सोन्याचे दागीने, मोबाईल व नगदी



रक्कम चोरली होती. सदर गुन्ह्याचा स्थानिक गुन्हे शाखेने समांतर तपास करुन, गुन्ह्यात आरोपी निष्पन्न करुन २ आरोपींना अटक केली आहे. या



गुन्ह्यातील आरोपींना अटक केली असून २२ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. एकूण तीन गुन्ह्यांमध्ये १७ आरोपींना अटक करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक विश्व पानसरे यांनी दिली आहे.

## राष्ट्रीय स्पर्धेमध्ये महाराष्ट्र लॉन टेनिस संघाला रौप्य पदक

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** स्कूल गेम्स फेडरेशन ऑफ इंडियाच्या अतंर्गत झारखंड शालेय शिक्षण व साक्षरता विभागाने रांची (झारखंड) येथे दि.१६ ते १९ जानेवारी दरम्यान ६८ व्या राष्ट्रीय शालेय लॉन टेनिस स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत महाराष्ट्र संघाने रौप्य पदकावर आपले नाव कोरीत महाराष्ट्र राज्य क्रीडा विभागाचे नाव लोकीक केले.

सांघिक प्रकारामध्ये संप्रित शर्मा, नीव कोठारी, लक्ष गुजराथी, अभिराम निखले, ओमकार शिंदे या सर्व खेळाडुंनी रौप्यपदक प्राप्त केले. महाराष्ट्राने झारखंड, पंजाब, सीबीएसई व चंदीगड संघावर विजय मिळवत रौप्य पदकाची कमाई केली. वैयक्तीक प्रकारात ओमकार शिंदेला रौप्यपदक व लक्ष गुलराथी याला कास्य पदक आपल्या नावे केले. मुलींच्या संघाने चौथ्या क्रमांक प्राप्त करत आपली वाटचाल कायम ठेवली. या यशाकरीता सर्व खेळाडुंचे तसेच संघ व्यवस्थापक डॉ. जीवन मोहोड, संघ मार्गदर्शक ओमकार साठे व राधिका महाजन यांचे जिल्हा क्रीडा अधिकारी बी.एस.महानकर तसेच क्रीडा अधिकारी आर.आर.धारपवार, संदीप केळे, राज्य क्रीडा मार्गदर्शक उज्वला लांडगे व इतर सर्व कर्मचारी वृंद यांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## २५ जानेवारीला राष्ट्रीय मतदार दिन राबविण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

**नांदेड/प्रतिनिधी :** राष्ट्रीय मतदार दिन कार्यक्रम २५ जानेवारी रोजी राबविण्याबाबत आज जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांना सर्व विभागप्रमुखांना सूचना केल्या. येत्या २५ जानेवारी रोजी १५ वा राष्ट्रीय मतदार दिन साजरा होत आहे.

या संदर्भात भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार मतदारांनी या दिवशी प्रतिज्ञा दिली जाते. तसेच विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. नवमतदारांना निवडणूक ओळखपत्र देणे, मतदारांची संख्या वाढविण्यासाठी कार्यक्रमांचे आयोजन करणे, राज्य, जिल्हा व मतदान केंद्रस्तरावर या निमित्त विविध जनजागृती कार्यक्रम आयोजित करणे असे या आयोजनाचे स्वरूप असते. जिल्ह्यामध्ये या दिवसाचे औचित्य साधून मतदान जनजागृती अभियान राबवावे, असे आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले आहे.



## राष्ट्रीय बालिका दिवसानिमित्त विशेष मोहिम; सुकन्या समृद्धी योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** भारतीय डाक विभागामार्फत दि. २४ जानेवारी २०२५ रोजी राष्ट्रीय बालिका दिवस दिवस साजरा करण्यात येणार आहे. या दिनानिमित्त जिल्ह्यातील आदिवासी, दुर्गम, डोंगराळ, वंचित व बँकिंग सेवा नसलेल्या भागातील मुलींच्या सक्षमीकरणासाठी सुकन्या समृद्धी योजना विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. मोहिमेंतर्गत सर्व नागरिकांनी जवळच्या डाक कार्यालयात संपर्क साधून आपल्या १० वर्षांच्या आतील मुलींचे सुकन्या समृध्दी खाते काढून मुलींचे भविष्य सुरक्षित करावे, असे आवाहन डाक अधीक्षक गणेश आंभोरे यांनी केले आहे.

## जिल्हा क्रीडा पुरस्कार घोषीत

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाचे क्रीडा धोरण २०१२ अंतर्गत क्रीडा क्षेत्रामध्ये मोलाचे कार्य करणाऱ्या खेळाडू, मार्गदर्शक, संघटक यांचे कार्याचा गौरव व्हावा, या उद्देशाने दरवर्षी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलडाणामार्फत जिल्हा क्रीडा पुरस्कार देण्यात येतो. जिल्हा क्रीडा पुरस्कार निवड समितीमार्फत सन २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ या वर्षाकरीता पुरस्कारार्थींची निवड करण्यात आलेली आहे. ते याप्रमाणे.

जिल्हा क्रीडा पुरस्कार सन २०२१-२२ : गुणवंत पुरुष खेळाडू – उज्वल भरत ओळेकर (धर्नुविद्या), गुणवंत दिव्यांग खेळाडू-अनुराधा पंढरी सोळंकी (तलवारबाजी) जिल्हा क्रीडा पुरस्कार सन २०२२-२३ : गुणवंत क्रीडा मार्गदर्शक- अमर भिमराव खराटे (आटयापाटया), गुणवंत पुरुष खेळाडू-अजय विजय पहुरकर (जिम्नस्टिक), गुणवंत महिला खेळाडू- ऐश्र्वर्या श्रीकृष्ण भोंडे (फुटबॉल), गुणवंत दिव्यांग खेळाडू-शुभम दिनकर अवचार (थलॅटिक्स) जिल्हा क्रीडा पुरस्कार सन २०२३-२४: गुणवंत क्रीडापटु(पुरुष) – नयन प्रदीप सरडे (थलॅटिक्स), गुणवंत क्रीडा मार्गदर्शक-अक्षय दिलीप गोलांडे (तलवारबाजी), थेट पुरस्कार-मानव गणेश जाधव (धर्नुविद्या).

पुरस्काराचे स्वरुप १० हजार रुपये, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र असे असुन, दि. २६ जानेवारी २०२५ रोजी प्रजासत्ताक दिनाच्या समारंभाचे वेळी पोलीस कवायत मैदान, बुलढाणा येथे जिल्ह्याचे पालकमंत्री यांचे शुभहस्ते प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी बी.एस.महानकर यांनी कळविलेले आहे.

# आजाद समाज पार्टीचे अमरण उपोषण

### कंपनी व न.पं. ढाणकी चे संबंधीत अधिकारी कर्मचारी यांच्यावर कायदेशीर कार्यवाही ची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** ढाणकी न.पं. अंतर्गत इस्ना कंस्ट्रक्शन कंपनीने सुभाष वाईनबार ते गजानन जिल्हावार या सिमेंट रस्त्याचे काम चालू असताना आजाद समाज पार्टीने ०६/०९/२०२४ रोजी सदर रस्ता निकृष्ठ होत असल्याबाबत ढाणकी न.पं. निवेदन दिले होते. पण न.प. ढाणकी च्या प्रशासनाने या कडे निष्क्रिय पणे या कामाकडे दुर्लक्ष केल्याने लाखोंचा निधी धुळीत मिसळला गेला आहे. तसेच



कंत्रटदाराने मापदंडाला बगल दिल्याने सदर काम अतिषय निकृष्ठ दर्जाचे केल्याने रस्त्यावर धुळीचे साम्राज्य पसरले आहे.

रस्त्यालगतच शाळा, दवाखाने आहेत.विदयार्थी व नागरीकांच्या आरोग्यास या धुळीमुळे धोका निर्माण झाला असल्याने आजाद समाज पार्टी यांनी संबंधीत रस्ता बनवनारी कंपनी व न.पं. ढाणकी चे संबंधीत अधिकारी कर्मचारी यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करून सदर रस्ता तात्काळ दुरूस्त करण्यात यावा अन्यथा येत्या २६ जाने २०२५ रोजी न.पं. कार्यालयासमोर अमरण उपोषण करण्याचा निवेदन मुख्याधिकारी न.प. ढाणकी मार्फत जिल्हाधिकारी यांना दिला आहे.

# शिवसेनेच्या अत्याधुनिक कार्डीयाक रुग्णवाहिकेचे केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते लोकार्पण

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** शिवसेना खासदार डॉ.श्रीकांत शिंदे फाउंडेशनच्या वतीने देण्यात आलेल्या रुग्णवाहिकेचे माजी आमदार संजय रायमुलकर यांनी आधुनिकीकरण केले.सदर सर्वसुविधायुक्त रुग्णवाहिकेचे लोकार्पण आज केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते व संजय रायमुलकर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

लोणार मेहकर विधानसभा मतदार संघासाठी खा. डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशन तर्फे रुग्णांच्या सुविधेसाठी रुग्णवाहिका देण्यात आली होती. या रुग्णवाहिकेत सर्व वैद्यकीय साधनसामग्री बसवून माजी आमदार संजय रायमुलकर यांनी मतदार संघातील गरजू रुग्णांच्या सोयीसाठी स्वतः १८ लाख रुपये खर्चून ही रुग्णवाहिका अद्ययावत केली. आज केंद्रीय आयुष, आरोग्य, कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते आणि संजय रायमुलकर शिवसेनेचे जिल्हाप्रमुख प्रा.बळीराम मापारी, तालुकाप्रमुख सुरेशतात्या वाळूकर ,माजी नगराध्यक्ष रामराव म्हस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत रुग्णवाहिकेचे रितसर लोकार्पण करण्यात आले.

गरजू रुग्णांना ही रुग्णवाहिका माफक दरात उपलब्ध करून देण्यात आल्यामुळे दोन्ही तालुक्यातील नागरिकांना याचा मोठा फायदा होईल ,असे यावेळी बोलताना ना. प्रतापराव जाधव म्हणाले. विविध प्रकारची मदत करून मेहकर ,लोणार तालुक्यातील रुग्णांना शिवसेनेकडून नेहमीच वैद्यकीय मदतीचा हात देण्यात येतो. सर्व सुविधांनी युक्त रुग्णवाहिकेची आवश्यकता असल्यामुळे मुंबई येथून आवश्यक ती वैद्यकीय यंत्रसामुग्री





बसवून ही रुग्णवाहिका रुग्णांसाठी आजपासून उपलब्ध करून देण्यात येत आहे, असे माजी आमदार संजय रामुलकर म्हणाले. याप्रसंगी शिवसेना महिला आघाडीच्या वैशालीताई सावजी, यमुनाताई फंगाळ, कालींदा फंगाळ, रेखा बिबे यांच्यासह विलास मोहरूत, सुदर्शन मगर, विनोद पह्राड, विश्वंभर दराडे,डॉ. काशिनाथ घुगे,डॉ.अनिल गाभणे, सरपंच संघटनेचे अरुण दळवी, दिलीपबापू देशमुख , सुरेश आडे ,संतोष चनखोरे , सुरेश आढाव, विलास मुळे ,विजयकुमार सानप ,विजय मानवतकर, गोपाल पितळे, रामेश्वर भिसे ,कुंदन होले, सुरेश औदगे, कैलास जायभाये ,प्रकाश खोडवे ,मंगेश गायकवाड, अरुण पिंपळे, भुजंग रहाटे , मंटू राजूरकर ,तौफिक कुरेशी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.